राज्यात MICE ब्युरोच्या अंमलबजावणीसाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन विभाग
शासन निर्णय क्रमांक : टिडीएस २०२४/१०/प्र.क्र.१८५/पर्यटन-४ (E-८६६८३०)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ ऑगस्ट, २०२६

<u>संदर्भ</u> : १. समक्रमांक शासन निर्णय दि.१५/०५/२०२५.
२. समक्रमांक शासन निर्णय दिनांक : १४/०१/ २०२६.

<u>प्रस्तावना :</u>

MICE पर्यटन (मीटिंग्स, इन्सेन्टिव्ह्ज, कॉन्फरन्सेस आणि एक्झिबिशन्स) हे एक पर्यटनामधील वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. यामध्ये व्यावसायिक कार्यक्रम आणि पर्यटनाच्या संधी एकत्र आणल्यामुळे जागतिक पातळीवर प्रसिद्धी मिळते आणि त्याचबरोबर पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आर्थिक संधी निर्माण होतात. राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि संभाजीनगर यांसारख्या शहरांमध्ये MICE पर्यटनास खूप वाव आहे. राज्याला भारतातील अग्रगण्य MICE गंतव्यस्थान होण्यास या शहरांची प्रमुख भूमिका असणार आहे. या शहरातील क्षमतेचा योग्य प्रकारे उपयोग करून राज्याला भारतातील अग्रगण्य MICE गंतव्यस्थान बनवण्यासाठी या क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणे, धोरणात्मक नियोजन करणे, राज्यातील क्षमतेचा जागतिक कार्यक्रम बाजारपेठेत योग्य प्रकारे प्रचार करणे, इ. गरज असून याअनुषंगाने राज्यात समर्पित MICE ब्युरोची वरील संदर्भाधिन शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली आहे.

MICE Convention Bureau (MCB) ची स्थापना कंपनी अधिनियम-२०१३, कलम-८ अंतर्गत नॉन प्रॉफिट कंपनी म्हणून स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र कन्व्हेशन ब्युरोच्या (MCB) आर्थिक व्यवहारासाठी कोणत्याही बँकेत चालू खाते उघडण्यास दि.१४/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

MICE अंतर्गत राज्यात आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आकर्षित करणे, जागतिक परिषदा व प्रदर्शनांसाठी महाराष्ट्राची बोली लावण्याची क्षमता वाढवणे, कार्यक्रम आयोजकांना व्यावसायिक मदत पुरवणे आणि राज्यातील स्थळे, संपर्कता व आदरातिथ्य इ. करीता आंतरराष्ट्रीय स्तरावरील

उद्योगासाठीची कार्यरत असलेली इंटरनॅशनल कॉग्रेस अँड कन्व्हेशन असोसिएशन (ICCA) आणि जॉइंट मीटींग्स अँड इव्हेंट्स कन्सल्टन्सी (JWC) यांच्यासोबत मर्यादीत प्रमाणात भागिदारी करणे आणि त्याकरिता त्याकरीता एकूण रु.६,६२,८०,५००/-(सहा कोटी बासष्ट लक्ष ऐंशी हजार पाचशे रुपये फक्त) इतक्या निधीस दि.१४/०१/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. मंजूर करण्यात आलेला निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

MICE अंतर्गत राज्यात आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आकर्षित करणे, कार्यक्रम आयोजकांना व्यावसायिक मदत पुरवणे इ. करिता आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योगासाठीची कार्यरत असलेली इंटरनॅशनल कॉग्रेस अँड कन्व्हेशन असोसिएशन (ICCA) आणि जॉइंट मीटींग्स अँड इव्हेंट्स कन्सल्टन्सी (JWC) यांच्यासोबत मर्यादीत प्रमाणात भागिदारी करण्यास आणि त्याकरिता एकूण **रु. ६,६२,८०,०००/- (सहा कोटी बासष्ट लक्ष ऐंशीहजार फक्त)** इतका निधी वितरीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

०२. MICE अंतर्गत आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करणे याकरिता इंटरनॅशनल कॉग्रेस अँड कन्व्हेशन असोसिएशन (ICCA) आणि जॉइंट मीटींग्स अँड इव्हेंट्स कन्सल्टन्सी (JWC) या संस्थेसोबत भागीदारी करण्यास मान्यता देण्यात आलेल्या निधीमध्ये युरोपीय चलनातील परिवर्तनानुसार होणाऱ्या बदलास मान्यता देण्यात येत आहे.

०४. उपरोक्त नमूद करण्यात आलेला निधी हा सन २०२६-२७ या वर्षाच्या **मागणी क्रमांक झेडडी - ४, मुख्य लेखाशीर्ष ३४५२, पर्यटन धोरण-२०२४ (०४) (०१) पर्यटन धोरण-२०२४ अंतर्गत वित्तीय प्रोत्साहनासह इतर सवलती (३४५२ ३०९३) (कार्यक्रम) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर)** या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

०५. या प्रकरणी मंजूर करण्यात आलेली रक्कम आहरित करुन संबंधितांना वितरीत करण्याकरीता मुख्य लेखाधिकारी, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना "**आहरण व संवितरण अधिकारी**" आणि सहसंचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना **"नियंत्रण अधिकारी"** घोषित करण्यात येत आहे. मंजूर करण्यात आलेली रक्कम अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथून आहरित करुन संबंधितांना विहित पध्दतीव्दारे वितरीत करण्यात यावी.

०६. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ-५११/दि.२०.०७.२०२६/व्यय-१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेतांक <u>२०२६०८०५१३१९४०७७५०</u> असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल व यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANITA PRAMOD TUMMULWAR

Digitally signed by ANITA PRAMOD TUMMULWAR
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=4A2A38BD3219CB07837653760D3739E645909C87E1F590A4C48AC5BE90C246E8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=39B0AF455329387CB15636BD36438437C8ADACC592042C2DF9B77B499001996D, cn=ANITA PRAMOD TUMMULWAR
Date: 2026.08.05 13:21:15 +05'30'

(अनिता तुम्मुलवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
४. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. अवर सचिव, (अर्थसंकल्प शाखा) पर्यटन व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना निधी वितरीत करण्याच्या विनंतीसह
७. निवडनस्ती, (पर्यटन-४).

***